# प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था,(रामेती)

सर्वे नं.१/१, तापकीर चौक, वडमुखवाडी (चऱ्होली), पुणे-आळंदी रोड, पुणे -४१२१०५.
ईमेल आयडी-rametipune5@gmail.com

जा.क्र. रामेती पुणे/राप्रधो/प्रतिनि/१४१६/२०२५, दि.३०.१२.२०२५

## प्रतिनियुक्तीने पद भरण्यासाठी मागणीपत्र.

### राज्य प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत

प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था,(रामेती) पुणे या संस्थेमध्ये राज्य प्रशिक्षण धोरण २०११ नुसार राज्य प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत शासन सेवेतील अधिकारी वर्ग-२ व वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई क्र. यशदा २०१४/४४१/प्र.क्र.९३/१४/१२-अ, दि.११ मे, २०१५ मध्ये नमुद केलेली पदे भरण्याची कार्यपध्दती व प्रतिनियुक्तीने भरण्यात येणाऱ्या पदांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या विहित केल्या आहेत.

त्यास अनुसरुन शासन कृषि विभाग, मंत्रालय मुंबई या विभागाच्या अधिपत्याखालील **प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था,(रामेती) पुणे** या कार्यालयातील **राज्य प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत** खालील नमूद करण्यात आलेल्या पदांवर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासाठी शासन सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांचेकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

खाजगी क्षेत्रातील व्यक्ती/उमेदवार यांनी अर्ज सादर करु नयेत. खाजगी क्षेत्रातील व्यक्ती/उमेदवार यांनी अर्ज सादर केल्यास सदर अर्जाची दखल घेतली जाणार नाही.

| अ.क्र. | पदनाम | गट | पदांची संख्या | पदांची वेतनश्रेणी ७ व्या वेतन आयोगानुसार |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | निबंधक तथा सहायक प्राध्यापक | अ | ०१ | एस-१९-५५१००-१७५१०० |
| २ | सहायक प्राध्यापक वर्ग-१ | अ | ०५ | एस-१९-५५१००-१७५१०० |
| | १ समाजकल्याण व आदिवासी विकास संबंधित-१ पद | | | |
| | २ नागरी विकास संबंधित-१ पद | | | |
| | ३ अभियांत्रिकी व आरोग्य सेवेसंबंधीत-१ पद | | | |
| | ४ ग्राम-कृषि विकासाशी संबंधीत-२ पदे | | | |
| ३ | कार्यालय अधिक्षक/स्टेनोग्राफर वर्ग-३ | क | ०१ | एस-१३-३५४००-११२४०० |
| ४ | वसतीगृह तथा आवार व्यवस्थापक | क | ०१ | एस-१३-३५४००-११२४०० |
| ५ | ग्रंथपाल वर्ग-३ | क | ०१ | एस-०८-२५५००-८११०० |
| | एकूण | | ०९ | |

२. प्रतिनियुक्तीने नियुक्ती प्रथमत: तीन वर्षाच्या कालावधीसाठी राहील, तदनंतर आवश्यकता विचारात घेऊन संबंधी अधिकारी यांची इच्छुकता व प्रतिनियुक्तीने सेवा देणा-या संवर्ग नियंत्रण प्राधिका-याच्या सम्मतीने हा कालावधी जास्तीत जास्त ५ वर्षापर्यंत वाढविता येईल.

३. सर्व प्रशासकीय विभागांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांच्या अधिपत्याखालील कार्यरत असलेल्या वर नमूद केलेल्या संवर्गातील सर्व अधिकारी यांच्या निदर्शनास आणण्यात यावे.

४. सदर पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी इच्छुक व पात्र अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांचे अर्ज सोबत जोडलेल्या विहीत नमून्यात टंकलिखित करुन त्यांच्या प्रशासकीय विभागामार्फत निम्न स्वाक्षरीतांकडे **दिनांक ३१/०३/२०२६** पर्यंत पोहोचतील अशा बेताने पाठवावे.

५. प्रतिनियुक्तीने नियुक्ती घेऊ इच्छिणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांनी ते सद्या शासन सेवेत असल्याबाबतचे त्यांच्या कार्यालय प्रमुखाचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

६. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग(कार्या-१२), दि.१७.१२.२०१६ व समक्रमांक दि.१६.२.२०१८ व साप्रवि/(कार्या-१२अ), दि.११.५.२०१५ मधील निर्धारित तरतुदी, अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्याबाबत अर्जांची तपासणी करण्यात येईल.

७. प्रशासकीय विभागानी/संवर्ग नियंत्रक विभागानी परिपूर्ण स्वरुपातील अर्ज त्यांचे आवश्यक प्रमाणपत्रांसह व संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांच्या मागील ५ वर्षाचे गोपनिय अहवालाच्या सत्यप्रतीसह या विभागाकडे कोणत्याही परिस्थीतीत **दि.३१/०३/२०२६** पर्यंत पाठवावेत. विहीत मूदतीत अर्ज प्राप्त न झाल्यास अशा अधिकारी/कर्मचारी यांचा विचार केला जाणार नाही.

८. अंतिम दिनांकास प्राप्त अर्जांची छाननी केल्यानंतर पात्र अर्जांबाबत प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येतील.

-सही -
**प्राचार्य**
प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था,(रामेती) पुणे

## परिशिष्ट-ड

## प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी अर्जदारांनी करावयाच्या अर्जाचा नमुना

<table>
<tr><td>१)</td><td>अधिकारी/कर्मचारी यांचे संपूर्ण नांव</td><td></td></tr>
<tr><td>२)</td><td>ज्या पदासाठी अर्ज केला आहे ते पद व कार्यालयाचे नांव</td><td></td></tr>
<tr><td>३)</td><td>सध्या धारण केलेले पद व पदस्थापनेचे ठिकाण</td><td></td></tr>
<tr><td>४)</td><td>सध्या घेत असलेली वेतनश्रेणी</td><td></td></tr>
<tr><td>५)</td><td>सध्या कार्यरत असलेल्या पदाचा संवर्ग नियंत्रक विभाग</td><td></td></tr>
<tr><td>६)</td><td>भविष्य निर्वाह निधी /राष्ट्रीय निवृत्ती वेतन</td><td></td></tr>
<tr><td>७)</td><td>जन्मदिनांक</td><td></td></tr>
<tr><td>८)</td><td>अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास असलेले वय (वर्ष व महिने)</td><td></td></tr>
<tr><td>९)</td><td>अधिकारी /कर्मचाऱ्यांनी घोषित केलेला स्वग्राम तालुका व जिल्हा</td><td></td></tr>
<tr><td>१०)</td><td>प्रथम नियुक्तीचा दिनांक</td><td></td></tr>
<tr><td>११)</td><td>सध्याच्या पदावरील नियुक्तीचा दिनांक</td><td></td></tr>
<tr><td>१२)</td><td>सेवानिवृत्तीचा दिनांक ( पहा शा.नि.दिनांक १७-१२-२०१६ मधील तरतूद ५ ( ब ) ( ६ )</td><td></td></tr>
<tr><td>१३)</td><td>सध्या धारण केलेले पद नियमित आहे किंवा तात्पूरते आहे, नियमित असल्यास नियमित दिनांक</td><td></td></tr>
<tr><td>१४)</td><td>शैक्षणिक अर्हता व अनुभव</td><td></td></tr>
<tr><td>१५)</td><td>मागासवर्गीय प्रवर्गात येत असल्यास, प्रवर्ग</td><td></td></tr>
<tr><td>१६)</td><td>भ्रमणध्वनी क्रमांक</td><td></td></tr>
<tr><td>१७)</td><td>आतापर्यंत केलेल्या सेवेचा तपशील<br>(जागा कमी असल्यास स्वतंत्र विवरणपत्र जोडावे व त्यावर स्वत:ची स्वाक्षरी करावी.)
<table>
<tr><td rowspan="2">कार्यालय/विभाग</td><td rowspan="2">पद (संवर्ग) अथवा प्रतिनियुक्तीवर</td><td colspan="2">कालावधी</td><td rowspan="2">वेतनश्रेणी</td><td rowspan="2">कामाचे स्वरुप</td></tr>
<tr><td>पासून</td><td>पर्यंत</td></tr>
</table></td><td></td></tr>
<tr><td>१८)</td><td>मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या छायाप्रती (मूळ गोपनीय अहवाल पाठवू नयेत )</td><td></td></tr>
<tr><td>१९)</td><td>मत्ता व दायित्व विवरणपत्र सादर केले आहे का ? (दि.३१.३.२०२५ रोजीचे)</td><td></td></tr>
<tr><td>२०)</td><td>५०/५५ व्या वर्षी पुनर्विलोकन केले आहे का ? (लागू असल्यास)</td><td></td></tr>
<tr><td>२१)</td><td>संबंधित कर्मचाऱ्याला यापूर्वी प्रतिनियुक्ती दिली असल्यास तपशील (पद, ठिकाण व कालावधी)
<table>
<tr><td>दि.---------पासून<br>दि.---------पर्यंत</td><td>पद</td><td>प्रतिनियुक्तीचे ठिकाण (कार्यालय)</td></tr>
</table></td><td>प्रतिनियुक्तीचा एकूण कालावधी --------- वर्षे</td></tr>
<tr><td>२२)</td><td>संबंधित कर्मचाऱ्याविरुध्द विभागीय चौकशी/न्यायालयीन प्रकरणे सुरु अथवा प्रस्तावित आहे काय ?</td><td></td></tr>
<tr><td>२३)</td><td>मागील प्रतिनियुक्तीवरून परत आल्याच्या दिनांकापासून ३ वर्षे पूर्ण झाली आहेत का ?</td><td></td></tr>
<tr><td>२४)</td><td>प्रतिनियुक्तीकरिता विभागाची सहमती आहे किंवा कसे ?</td><td></td></tr>
</table>

**संपर्क तपशिल :-**

**अ) पत्ता :** ----------------------------------------------------
----------------------------------------------------
----------------------------------------------------
दुरध्वनी क्रमांक : ---------------------------------------
ई-मेल : ---------------------------------------------

**ब) कार्यालयीन पत्ता :** ----------------------------------------------------
----------------------------------------------------
----------------------------------------------------
दुरध्वनी क्रमांक : ---------------------------------------
ई-मेल : ----------------------------------------------

मी श्री/श्रीमती ---------------------------------------------- असे प्रमाणिक करतो/करते की, मी प्रतिनियुक्तीने भरावयाच्या पदाच्या मागणीपत्रातील तपशील वाचले असून पदासाठी विहित केलेल्या अर्हता मी धारण करीत असल्याने सदर पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी अर्ज सादर करीत आहे. अर्जात नमूद केलेली माहिती खरी असून खोटी आढळून आल्यास माझा अर्ज नाकारला जाऊ शकतो याची मला जाणीव आहे.

सही

(नाव)

पदनाम ------------------------------------

**प्रशासकीय विभाग व संवर्ग नियंत्रक विभागाने भरावयाचा तपशिल.**

**प्रमाणित करण्यात येते की,**

१. श्री/श्रीमती -------------------------------- पद -------------- यांनी सादर केलेला अर्ज तपासला असून त्यांनी अर्जामध्ये दिलेली माहिती सेवा अभिलेखानूसार बरोबर आहे.

२. श्री/श्रीमती---------------------------------- पद -------------- यांची प्रतिनियुक्तीच्या पदासाठी निवड झाल्यास त्यांना प्रतिनियुक्तीच्या पदावर हजर होण्यासाठी कार्यमुक्त करण्यात येईल.

३. श्री/श्रीमती--------------------------------- पद --------------- यांचे विरुध्द मनासे (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम ८ नुसार कोणतीही विभागीय चौकशी सुरु नाही अथवा त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार /लाचलूचपत गुन्ह्यासंदर्भातील प्रकरण, फौजदारी प्रकरण प्रलंबित नाही.

४. श्री/श्रीमती--------------------------------- पद --------------- यांचे विरुध्द कोणत्याही शिक्षेची अंमलबजावणी चालू नाही.

५. श्री/श्रीमती---------------------------------- पद ---------------- यांना मागील १० वर्षाच्या कालावधीमध्ये झालेल्या गंभीर अथवा किरकोळ शिक्षेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| पद | शिक्षेचे स्वरुप | शिक्षा संपुष्टात आल्याचा दिनांक |
|---|---|---|
| | | |
| | | |

६. प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती ---------------------हे कार्यरत असलेल्या संवर्गामध्ये अर्ज अग्रेषित करण्याच्या दिनांकास १० टक्के पेक्षा अधिक पदे रिक्त नाहीत.

७. श्री/श्रीमती---------------------------यांना प्रतिनियुक्तीने----------------------------- या पदावर----------------------- या कार्यालयात नियुक्त करण्यास या विभागाची हरकत नाही.

८. श्री/श्रीमती --------------------यांच्या उपलब्ध असलेल्या मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या सत्यप्रती सोबत जोडून पाठविण्यात येत आहेत.

**दिनांक** ------------------------ **सही/-**

( **नाव**-----------------------)

**पदनाम**----------------------

----------------------- विभाग